# महात्मा फुलेंचा जीव घेण्यासाठी आलेले मारेकरी

1956 सालची ही खरी घडलेली घटना. दिवसभराचे काम आटोपून मध्यरात्री फुले आराम करत होते. नीरव शांतता होती. त्याचवेळी त्यांना घरात असलेल्या खुडबुडीने जाग आली. घरात समईचा मंद प्रकाश होता त्यात त्यांना दोन अंधुक आकृत्या दिसल्या. सुपारी देऊन पाठविलेले ते मारेकरी होते.

त्यांनी मोठ्याने विचारले, "कोण आहे रे तिकडे?"

असे विचारताच त्या मारेकऱ्यांपैकी एकाने म्हटले "तुमचा निकाल करावयास आम्ही आलो आहोत."

तर दुसरा मारेकरी ओरडला, "तुम्हांला यमसदनाला पाठवण्यासाठी आम्हांला धाडले आहे."

हे ऐकताच महात्मा फुलेंनी त्यांना विचारले, "मी तुमचा काय अपराध केला आहे, ज्यामुळे तुम्ही मला मारत आहात?"

त्यावर ते दोघे उत्तरले की, "तुम्ही आमचे काही वाईट केले नाही पण तुमचा निकाल लावण्यासाठी आम्हाला पाठवले आहे."

महात्मा फुलेंनी त्यांना म्हटले की, "मला मारून तुमचा काय फायदा?"

यावर ते म्हणाले, "तुम्हाला मारल्यास आम्हाला प्रत्येकी हजार रुपये मिळणार आहेत."

हे ऐकताच महात्मा फुले म्हणाले, "अरे, वा! माझ्या मृत्यूने तुमचा फायदा होणार आहे, तर घ्या माझे डोके. ज्या गरीब जनतेची सेवा करण्यात मी सद्भाग्य आणि धन्यता मानली, त्यांनीच माझ्या गळयावरुन सुरी फिरवावी हे माझे सद्भाग्य होय. चला आटपा. माझे आयुष्य दलितांकरिताच आहे. कसे झाले तरी माझ्या मरणानेसुद्धा गरिबांचेच हित होत आहे."

त्यांचे हे उद्गार ऐकून मारेकरी भानावर आले आणि त्यांनी महात्मा फुलेंची माफी मागितली. महात्मा फुलेंनी त्यांना समजावून सांगितले.

उलट ज्या लोकांनी मारण्यासाठी पाठवले आहे त्यांना मारण्याची आम्हाला परवानगी द्या, असं ते म्हणाले. यावर सूडबुद्धी नसावी अशीच समज दिली.

या प्रसंगानंतर त्या दोन मारेकयांचे काय झाले? या मारेकऱ्यांपैकी एक **धोंडिराम नामदेव कुंभार** याने जोतिबा फुले यांच्याजवळ शिक्षण घेऊन, त्यांच्याच आज्ञेने काशी येथे जाऊन संस्कृत विद्या संपादन केली. **धोंडिराम नामदेव कुंभार हे पंडित धोंडिराम कुंभार झाले.** पंडितराव हा बहुमानाचा किताब

मिळविला. 12 फेब्रुवारी 1884 रोजी सातारा जिल्ह्यातील गोंदवले येथे शृंगेरी मठाच्या शंकाराचार्यांना आणि ब्रह्मवृंदांना वेदांवरील वादविवादामध्ये पराभूत केले. पंडित धोंडिराम कुंभार यांनी सत्यशोधक समाजाचा प्रसार खूप धडाडीने केला. त्यांनी अखंड रचनाही केली आहे**. "सत्यशोधक समाजाची मते चांगली आहेत. सर्व समाजाने त्या समाजाचे अनुयायी व्हावे."** अशी आज्ञा करणारा ताम्रपट; शिक्का आणि सहीसह त्यांनी दिला.

दुसरा मारेकरी रोडे हा रामोशी होता. तो जोतिबा सावित्रीबाई यांचा अंगरक्षक बनला. त्याची सून **सावित्रीबाई रोडे सत्यशोधक समाजाची अध्यक्षा** झाली. सत्यशोधक समाजाचा विचार या कुटुंबाने पुढे दोन-तीन पिढ्यांत निष्ठेने जतन केला. मारेकऱ्यांचे हृदयपरिवर्तन घडून नव्या इतिहास निर्मितीला आणि ऐतिहासिक कार्याला चालना देणारा असा प्रसंग इतिहासात तरी अजोड आहे.

**ज्याप्रमाणे गौतम बुद्धांनी डाकू अंगुलीमालाचे हृदयपरिवर्तन करून त्याला बौद्ध भिक्खू बनवले त्याच प्रमाणे महात्मा फुले यांची हत्या करण्यासाठी आलेल्या दोन जणांनी महात्मा फुलेंना सामाजिक कार्यात साथ दिली. त्या दोघांपैकी एक जण महात्मा फुलेंचा अंगरक्षक बनला तर दुसरे गृहस्थ सत्यशोधक समाजाचे पंडित बनले आणि त्यांनी ग्रंथरचना देखील केली.**

# जोतीबा सावित्रीबाईंनी सोसलेला अन्याय

महात्मा फुलेंचे शिक्षण आधी मराठी शाळेत झाले आणि नंतर ते मिशनऱ्यांच्या शाळेत झाले. त्यांच्या वडिलांचा म्हणजेच गोविंदरावांचा फुलांचा व्यवसाय होता. त्या काळी ब्राह्मणेतरांना शिक्षण घेतलेले काही सनातनी ब्राह्मणांना खुपत असे. त्यांनी जोतिबा फुलेंच्या वडिलांचे कान भरले आणि सांगितले **“जर आता तुमच्या मुलाने शिक्षण घेतले तर त्याचे मन शेती आणि बागकाम करण्यात लागणार नाही. तो उद्धट होईल.”**

त्यामुळे त्यांच्या वडिलांनी त्यांना शिक्षण थांबवण्यास सांगितले. पण तोपर्यंत जोतिबा फुले यांना इंग्रजी येऊ लागले होते. त्यांनी विविध वैचारिक ग्रंथांचे आणि राज्यक्रांत्यांचा अभ्यास केला होता.

थॉमस पेनचे **राइट्स ऑफ मॅन** हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्यामुळे **मानवाचे काही मूलभूत हक्क आहेत आणि ते मिळवणे हा आपला अधिकार आहे** अशी जाणीव त्यांच्या मनात घर करू लागली होती.

त्यांच्या मनात असलेल्या या विचारांना ध्येयाचं स्वरूप मिळवून देणारा एक प्रसंग त्यांच्या आयुष्यात घडला.

1948 सालची गोष्ट. एकदा त्यांच्या एका ब्राह्मण मित्राचं लग्न ठरलं. त्यांना लग्नाचे निमंत्रण आले. ते त्याच्या मिरवणुकीत सहभागी झाले होते. ते मिरवणुकीतून चालत असता जोतिबांना वरातीतील इतर ब्राह्मणांनी ओळखलं. **‘हा कोण शूद्र कुणबट!’** अशी कुजबूज करून त्यांच्या अंगावर खेकसले.

त्यातला एक जण त्यांना म्हणाला, **"तू जातिपातीची सगळी बंधने आणि रीतिरिवाज धुडकावून आमचा असा अपमान करतोस काय? तू आमच्या बरोबरीचा आहेस असं समजतोस की काय? अंस वागण्यापूर्वी तू शंभरवेळा विचार करावयास पाहिजे होतास. चल हट मागं अन् चालू लाग सर्वांच्या मागून."**

या बोलण्याचा जोतिबांवर गंभीर परिणाम झाला. **आपल्याला प्राण्यापेक्षा हीन वागणूक का मिळत आहे** याचा त्यांना विचार केला. आपल्या हाती असलेली साधन संपत्ती, आपण ज्या समाजातून आलो आहोत त्या समाजाची पार्श्वभूमी या सर्व गोष्टींचा त्यांनी विचार केला आणि एक गोष्ट त्यांच्या ध्यानात आली ती म्हणजे **शिक्षणाच्या अभावामुळे या दोन्ही वर्गात हे भेद निर्माण झाले आहेत.**

शिक्षण नसल्यामुळे शेकडो वर्षांच्या गुलामगिरीत अडकावे लागले आहे. **शिक्षण केवळ एकाच वर्गापुरते मर्यादित आहे. इतरांना तर ते धर्मग्रंथ पाहायचा देखील अधिकार नाही. जर आपण**

**शिक्षणाची दारं सर्वांसाठी खुली केली तर निश्चितच गुलामगिरीची बंधने झुगारून देता येतील असा विचार त्यांच्या मनात आला** आणि त्यांनी समाजातील शोषितांसाठी कार्य करण्याचा निर्धार केला.

पूर्ण विचारांती महिला शिक्षणाचे कार्य हाती घेण्याचा संकल्प त्यांनी केला. महिलांच्या शिक्षणाचे कार्य आपण का हाती घेतले याविषयी महात्मा फुलेंनी काय सांगितले याची एक नोंद आहे. त्यात ते म्हणतात, **"स्त्रियांच्या शाळेने प्रथम माझे लक्ष वेधले. पूर्ण विचारांती माझे असे मत झाले की, पुरुषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षांत जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे असतात."**

हा विचार समोर ठेऊनच महात्मा फुलेंनी 1848 मध्ये आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पुण्यात भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली. पुणे हा सनातनी लोकांचा बालेकिल्ला होता. मुलींसाठी शाळा काढली आणि त्यातही बहुजन वर्गातील मुली या ठिकाणी येत आहेत यामुळे **सनातनी लोकांच्या अंगाचा तिळपापड झाला.**

ही शाळा बंद करावी म्हणून त्यांना धमक्या येऊ लागल्या. त्यांच्या धमक्यांना जोतिबा भीक घालत नाहीत असे दिसल्यावर हे लोक जोतिबांच्या वडिलांकडे गेले.

त्यांना सांगितले की, **“जर तुम्ही ही गोष्ट थांबवण्यास सांगितली नाही तर आम्ही तुम्हाला वाळीत टाकू.”** जोतिबांच्या वडिलांनी त्यांना सांगितले, **“एक तर घर सोड किंवा शाळा बंद कर.”** जोतिबांनी सांगितले की **“मी शाळा तर बंद करू शकत नाही”,** शेवटी त्यांना नाइलाजाने सावित्रीबाई यांच्यासोबत घर सोडावे लागले.

अशावेळी पुण्यातील उस्मान शेख यांनी त्यांना राहायला घर दिले.

जोतीबा सावित्रीना लोकांचे बोलणे, टोमणे आणि प्रसंगी शिव्या खाव्या लागल्या.

काही लोकांनी सावित्रीबाई शिकवायला जाताना त्यांच्यावर दगडगोटे, शेण देखील फेकले पण ते आपल्या जीवितकार्यापासून ढळले नाही.